# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/07/2023 (सोमवार) सकाळ

## चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा टेंभरी शिवार पंकज बार जवळ येथे दि. २२/०७/२०२३ चे रात्री ११.०० वा. ते दिनांक २३/०७/२०२३ चे सकाळी ०७.०० वा. दरम्यान बांधकाम करणारे ठेकेदार हे मिस्त्री मजुरासह बांधकामाचे ठिकाणी गेले असता त्यांना बांधकामाचे साहीत्य व लोखंडी वस्तु दिसले नाही म्हणुन त्यांनी फिर्यादी नामे– शिवाजी हाउसुजी पांचागे, वय ५१ वर्ष, रा. सालई मेंढा (पाचगाव) यांचे फोनवर फोन करून माहीती दिली कि १) लोखंडी लोहा ३३९ किलो किंमती अंदाजे २०,३७०/–रू. २) एक लोखंडी जुना वापरला पलंग किंमती अंदाजे १०००/–रू. ३) चार लोखंडी हातोडी किंमती अंदाजे ४००/– रू. ४) २८ लोखंडी तराफे किंमती अंदाजे २४,०००/–रू. लाकुड ५) लोहा कापण्याची मशीन किंमती अंदाजे ६०००/– रू. ६) रिंगा बनविण्याचा ठिया किंमती अंदाजे ३०००/– रू. ७) दोन लोखंडी खिडक्या किंमती अंदाजे २०००/– रू. असा एकुण ५६,७७०/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके मो. क्र. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा :– दिनांक २३/०७/२०२३ चे ०७.३० वा. ०८.३० वा. दरम्यान पो.स्टे. मौदा हद्दीत यातील फिर्यादी हे ६ महिन्या पासून रंजित ठाकूर रा. नागपूर यांची गाडी क्र. MH-40-CD-7879 ही किरायाने चालवितो दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ७.३० वा. फिर्यादी हे तारसा ज्वाईट येथे गाडया भरण्या करीता उभा असता **आरोपी नामे– रंजित ठाकूर** हा त्याच्या दोन मित्रा सोबत कार क्र. MH-49-BR-7979 फिर्यादी जवळ आला व काहीही न बोलता हातबूक्यांनी मारहाण केले व जबरदस्तीने त्याने तारसा ज्वाईट येथून आपल्या कारमध्ये घेवून गेला व म्हटले कि "माझे गाडीचे पैसे दे नही तो तूझे नागपूर ले जाकर आफिस मे लटकाता हू" असे म्हणून हातबूक्क्यांनी मारहाण करून तेव्हा "मी तूला पैसे देतो मला सोडून दे" असे म्हणून फिर्यादीने त्याला फोनपे ने ९०००/– रु. पाठवले. ते टोल नाका येथे पाहोचले तेथे त्यांनी फिर्यादी यांना गाडीतून बाहेर ढकलून दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३२३, ५०६, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा आंधळे ब. नं. ७२१ मो. क्र. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर